# मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

**(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)**

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१-बी) अंतर्गत)**

**सूचना**

**क्र.मुंमप्रझोपुप्रा/नरवि/फेरबदल/एसआर-११४/ठाणे/२०२६/२८** दि. 15 JUL 2026

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाने दि.०४ ऑक्टोबर १९९९ रोजीची अधिसूचना क्र.TPS १२९७/१३५९/CR.१४८/९७/UD-१२ अन्वये ठाणे महानगरपालिकेच्या सुधारीत विकास योजनेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये दि.०३/०४/२००३ रोजी मंजुरी दिलेली असून ती विकास योजना दि.१४/०५/२००३ पासून अंमलात आली आहे **(यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधण्यात येईल)**;

आणि ज्याअर्थी, एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडील अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वियो. व प्रायो./कलम ३७ (१ कक) (ग) व कलम २०(४)/नवि-१३, दि.०२ डिसेंबर, २०२० अन्वये मंजूरी दिलेली असून ती दिनांक ०३ डिसेंबर २०२० रोजी अमंलात आली आहे **(यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करण्यात आलेला आहे)**;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभागाने ०८ सप्टेंबर २०२० रोजीची अधिसूचना क्रमांक-एमएमआर-२०२०/प्र.क्र.५६/२०२०/झोपसु अन्वये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुर्नविकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(अ) मधील तरतुदींच्या अधिन राहून "मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)" ची त्याच्या अधिकार क्षेत्रासाठी नियुक्ती केलेली आहे. **(यापुढे "उक्त प्राधिकरण" असे संबोधण्यात येईल)**;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना (सुधारणा) अधिनियम १९६६ **(यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधण्यात येईल)** चे कलम २(१९) (बी) नुसार उक्त प्राधिकरणास त्याच्या अधिकार क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता उक्त अधिनियमात अभिप्रेत असणारा नियोजन प्राधिकरणाचा दर्जा दिलेला असून आणि उक्त अधिनियमातील कलम ३७(१-बी) अन्वये उक्त विकास योजनेत फेरबदल करण्यासंबंधीचा प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करण्याचा अधिकार उक्त प्राधिकरणास प्रदान करण्यात आला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाचा अभिसरण पध्दतीने केलेला ठराव क्र.२अ, दि.०९/०९/२०२१ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविताना उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१-बी) व इतर योग्य त्या कलमाखाली मंजूर विकास योजनेमध्ये आवश्यकतेनुसार फेरबदल, सुधारणा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांना आवश्यकता भासल्यास तशा

**ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, ग्लॅडी अल्वारीस रस्ता, मानपाडा, ठाणे (पश्चिम) – ४०० ६१०.**
**दूरध्वनी क्रमांक : ०२२-२५८४३९०० / ईमेल : thane@sra.gov.in**

प्रकारच्या प्रस्तावावर जनतेकडून हरकती/ सूचना मागविण्याची तसेच सूचना/हरकती विचारात घेऊन त्यानुषंगाने प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठीचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, ठाणे शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे-चितळसर, मानपाडा, सेक्टर-४, न.भू.क्र.३०८१, ३०८२, ३०८३, ३०८४ व ३११३ पै, मौजे-माजिवडे, न.भू.क्र.३३९१, ३३९२, ३३९३, ३३९४, ३३९५, ३३९६ या भुखंडावरील आरक्षणाखालील बाधित होणारे अंदाजे १३९१.४३ चौ.मी. क्षेत्रावर **(यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त जमीन" याप्रमाणे करण्यात आला आहे)** नकाशात दर्शविलेल्या हद्दीमध्ये विद्यमान झोपडपट्टी असून ती "श्री मारूती सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित)" म्हणून ओळखली जाते **(यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त झोपडपट्टी" याप्रमाणे करण्यात आला आहे)** व सदर क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करण्यात आले आहे;

आणि ज्याअर्थी उक्त जमिनीच्या क्षेत्रातील झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन उक्त जमिनीवरच करण्यासाठी उक्त जमिनीचा विकास उक्त झोपडपट्टीच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत उक्त नियमावलीतील विनियम क्र. १४.७ च्या तरतुदीनुसार करण्याचे प्रस्तावित केलेले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेत, उक्त झोपडपट्टी व्याप्त जमिनीवर अस्तित्वातील "तत्वज्ञान विद्यापीठ" (सार्वजनिक/निमसार्वजनिक) वापर दर्शविलेला असून **(यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त नियोजन प्रस्ताव" याप्रमाणे करण्यात आला आहे)** त्यामुळे उक्त जमिनीवरील झोपडपट्टीच्या पुनर्वसन योजनेची अमंलबजावणी करणे कठीण झालेले आहे. त्याचप्रमाणे, प्रारूप प्रसिध्द सुधारीत विकास योजनेत, उक्त जमिन अस्तित्वातील "Tatva Gyan Vidhyapeeth" या वापरासाठी दर्शविण्यात आलेला आहे. त्यामुळे उक्त विकास योजनेत उक्त झोपडपट्टी व्याप्त जमिनीखालील क्षेत्र हे "रहिवास विभागात" समाविष्ट करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीतील विनियम क्र.१४.७.६ चे उपनियम (iii) मधील तरतुदींस अनुसरुन उक्त झोपडपट्टीतील झोपडपट्टीवासीयांचा त्याच ठिकाणी पुनर्वसनाचा हक्क कायम करण्यासाठी, उक्त जमीन उक्त नियोजन प्रस्तावातून वगळून "रहिवास विभागात" समाविष्ट करणे या फेरबदलाकरीता उक्त अधिनियमातील कलम ३७(१-बी) अनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे उक्त प्राधिकरणाचे मत झाले आहे **(यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आला आहे)**;

आणि त्याअर्थी, आता उक्त अधिनियमातील कलम ३७ मधील उपकलम (१-बी) अनुसार उक्त प्राधिकरण खालील अनुसूचीमध्ये विश्लेषित केल्यानुसारच्या प्रस्तावित फेरबदला संदर्भात सर्वसामान्य नागरीकांकडून सूचना आणि/किंवा हरकती मागविण्याची सूचना प्रसिध्द करीत आहे. सदरची सूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १ (एक) महिन्यात सूचना आणि/किंवा हरकती मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, मानपाडा, ग्लॅडी अल्वारीस रस्ता, ठाणे (पश्चिम)-४००६१० यांचे कडे दाखल करण्यात याव्यात. विहित मुदतीत प्राप्त होणा-या सूचना आणि/किंवा हरकती मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून विचारात घेण्यात येतील;

## अनुसूची

"ठाणे शहराच्या मंजूर विकास योजनेमधील अस्तित्वातील "तत्वज्ञान विद्यापीठ" (सार्वजनिक/निमसार्वजनिक) वापर याप्रमाणे दर्शविलेले एकूण क्षेत्रापैकी मौजे-चितळसर, मानपाडा, सेक्टर-४, न.भू.क्र.३०८१, ३०८२, ३०८३, ३०८४ व ३११३ पै, मौजे-माजिवडे, न.भू.क्र.३३९१, ३३९२, ३३९३, ३३९४, ३३९५, ३३९६ या भुखंडावरील "श्री मारूती सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित)" या घोषित झोपडपट्टी व्याप्त क्षेत्रावरील अंदाजे १३९१.४३ चौ.मी. क्षेत्र "रहिवास विभागात" समाविष्ट करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे."

०२. उपरोक्त प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा खालील कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत एक महिन्याच्या कालावधीकरीता सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(१) आयुक्त, ठाणे महानगरपालिका, दूसरा मजला, महानगरपालिका भवन, चंदनवाडी पांचपाखाडी, ठाणे.

(२) जिल्हाधिकारी, ठाणे जिल्हा, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.

(३) सहायक संचालक नगर रचना, ठाणे शाखा, तिसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.

(४)सहायक संचालक नगर रचना, शहर विकास विभाग, चौथा मजला, महानगरपालिका भवन चंदनवाडी पांचपाखाडी, ठाणे.

(५) मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, मानपाडा, ग्लॅडी अल्वारीस रस्ता, ठाणे (पश्चिम)-४००६१० यांच्या कार्यालयात उपलब्ध असून कार्यालयीन वेळेत पाहता येईल.

०३. सदरची सूचना ही मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या www.mmrsra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध राहील.

ठिकाण - ठाणे
दि.१५/०७/२०२६

(संदीप माळवी)
मुख्य कार्यकारी अधिकारी
मुंबई महानगर प्रदेश
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

Slum Rehabilitation Authority
(excluding the Brihan-Mumbai Municipal Corporation Area)

(Under section 37(1-B) of the Maharashtra Regional and Town planning Act 1966)

# NOTICE

**NO.MMR SRA/TP/Modification/SR-114/Thane/2026/** 28 **Date -** 15 JUL 2026

Whereas, the Revised Development Plan of Thane Municipal Corporation, has been sanctioned Partly by Government of Maharashtra vide Urban Development Department's Notification No. TPS 1297/1359/CR.148/97/UD-12, dated-04 October 1999 under Section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and which has partly come into force with effect from 14 May 2003 **(hereinafter referred to as "the said Development Plan");**

And whereas, the Unified Development Control and Promotion Regulations have been sanctioned by Government of Maharashtra vide Urban Development Department's Notification No. TPS-1818/CR-236/18/DP&RP/sec-37(1AA)(c) & Sec20(4)/UD-13, dated-02 December 2020, and which has come into force with effect from 03 December 2020 **(hereinafter referred to as "the said Regulation");**

And whereas, the Government of Maharashtra vide Housing Department's Notification No.MMR-2020/CR-56/2020/Zopasu, dated-08 September 2020, has appointed "Mumbai Metropolitan Region Slum Rehabilitation Authority (excluding the Brihan-Mumbai Municipal Corporation Area)" under the provisions of section 3(A) of the Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act,1971 for its jurisdiction. **(hereinafter referred to as "the said Authority");**

And whereas, according to the provisions of section 2(19) (b) of the Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Act 1966, **(hereinafter referred to as "the said Act")** the said Authority has been declared as the Planning Authority for the purpose of implementation of Slum Rehabilitation Scheme in its jurisdiction and has been empowered to initiate modification to the said Development Plan under the provisions of sub section (1-B) of Section 37 of the said Act and to submit the same to State Government;

And whereas, the said Authority, vide their Resolution No.2A, dated-09 September 2021, passed by circulation, while implementing the Slum Rehabilitation Scheme, if the Chief Executive Officer, of the said Authority, finds it necessary to make modification or correction in the sanctioned Development Plan under the provisions of sub section (1-B) of Section 37

and other relevant sections of the said Act, the Chief Executive Officer of the said Authority can call for Objections & Suggestions, and after considering Objections & Suggestions received from the public, submit a proposal to the State Government for sanction:

And whereas, on the land bearing Village-Chitalsar, Manpada, Tal-Thane, Sector-4 C.T.S No. 3081, 3082, 3083, 3084 & 3113part, Village- Majiwade, 3391, 3392, 3393, 3394, 3395, 3396 of having an approximate area 1391.43 sq.m. **(hereinafter referred to as "the said Land")** as shown on the map, there is an existing slum, and that slum is known as "Shree Maruti Co-op Housing Society (Proposed)" **(hereinafter referred to as "the said Slum")** and the said Land is declared as "Slum Rehabilitation Area" under the provisions of Section 3(C) of Maharashtra Slum Areas (Improvement, Clearance and Redevelopment) Act,1971;

And whereas, in order to rehabilitate the slum dwellers of the said Land, in-situ, it is proposed to redevelop the said land by implementing Slum Rehabilitation Scheme as per the provision of the Regulation No. 14.7 of the said Regulation;

And whereas, in the said Development Plan, the said Land is shown as EXISTING "TATVA GYAN VIDHYAPEETH" (PUBLIC/SEMI-PUBLIC) use and this causes hardship/ impediment in implementation of the Slum Rehabilitation Scheme on the said Land. Similarly, in the Draft Revised Development Plan the said Land is shown as EXISTING "TATVA GYAN VIDHYAPEETH". Therefore, it is necessary to redesignate the area of the said Land in the "Residential Zone" in the said Development Plan;

And whereas in order to uphold the rights of all eligible slum dwellers for in-situ rehabilitation as per provisions of sub rule (iii) of Regulation No. 14.7.6 of said Regulation, the said Authority is of the opinion that it is necessary, to initiate the procedure under Section 37(1-B) of the said Act to delete the said Land from the said planning proposal and redesignate it as "Residential Zone". **(hereinafter referred to as "the said Modification") as shown on plan.;**

Now therefore, in accordance with the provisions contained in sub-section (1-B) of section 37 of the said Act, the said Authority hereby invites suggestions and/or objections from the general public in respect of the proposed modification described in the schedule herein below. The suggestion and/or objections shall be addressed, within 1 (one) month from the date of publication of the notice in the Maharashtra Government Gazette, to the Chief Executive Officer, Mumbai Metropolitan Region Slum Rehabilitation Authority, Thane Municipal Mandai Building, Khewara Circle, Manpada, Glady Alwaris Road, Thane (West) -400610. The suggestions and/or objections received within the aforesaid stipulated period shall only be considered by the said Authority;

## SCHEDULE

"In the sanctioned Development Plan for Thane City, land bearing Village-Chitalsar, Manpada, Tal-Thane, Sector-4 C.T.S No. 3081, 3082, 3083, 3084 & 3113part, Village-Majiwade, 3391, 3392, 3393, 3394, 3395, 3396 approximate area of 1391.43 sq.m. occupied by Declared slum of "Shree Maruti Co-op Housing Society (Proposed)", which is shown as EXISTING "TATVA GYAN VIDHYAPEETH" (PUBLIC/SEMI-PUBLIC) use is proposed to be deleted and redesignate for "Residential Zone".

**02.** A copy of the part plan showing the proposed modification shall be kept open for inspection by the general public in the following offices for the period of one month:-

(1) Commissioner, Thane Municipal Corporation, Second floor, Mahapalika Bhavan, Chandanwadi Pachpakhadi, Thane.

(2) Collector, Thane District, First floor, Collector Office Building, Thane.

(3) Assistant Director of Town planning, Thane Branch. Third floor, Collector Office Building, Thane.

(4) Assistant Director of Town Planning, Thane Municipal Corporation Fourth Floor, Mahapalika Bhavan, Chandanwadi, Thane.

(5) Chief Executive Officer, Mumbai Metropolitan Regional Slum Rehabilitation Authority, Thane Municipal Mandai Building, Khewra Circle, Manpada, Glady Alwaris Road, Thane (West) -400610

03. This notice will be available on the website www.mmrsra.gov.in

**Thane**
**Dated-15 / 07 /2026**

**(Sandeep Malvi)**
**Chief Executive Officer**
**Mumbai Metropolitan Region**
**Slum Rehabilitation Authority**